**राज्याचा धरणसाठा**

शनिवार (ता. २१) सकाळी आठ वाजेपर्यंतचा धरणांतील उपयुक्त पाणीसाठा (टीएमसी)

| धरणे | एकूण क्षमता | आजचा साठा | टक्केवारी |
|---|---|---|---|
| **पुणे विभाग** | | | |
| टेमघर | ३.७१ | २.४३ | ६६ |
| वरसगाव | १२.८२ | ८.३९ | ६५ |
| खडकवासला | १.९७ | १.९७ | १०० |
| माणिकडोह | १०.१७ | ३.५९ | ३५ |
| घोड | ५.४७ | १.३३ | २४ |
| उजनी* | ११७.२१ | ७३.४८ | ६३ |
| कोयना* | १०५.२४ | ८३.६६ | ७८ |
| वारणा | २७.५५ | २२.०१ | ८० |
| **मराठवाडा विभाग** | | | |
| जायकवाडी* | १०२.६७ | ४५.३९ | ४४ |
| निम्न दुधना | ८.५४ | १.२९ | १५ |
| मांजरा | ६.२५ | ०.३५ | ६ |
| माजलगाव | १०.९८ | ०.२५ | २ |
| पूर्णा येलदरी | २८.६० | ०.०० | ० |
| **नाशिक विभाग** | | | |
| निळवंडे | ८.१९ | २.९३ | ३६ |
| भंडारदरा | १०.७३ | ८.९० | ८३ |
| मुळा | २१.५० | ७.९८ | ३७ |
| हतनूर | ९.०० | १.८१ | २० |
| वाघूर | ८.७६ | ३.०७ | ३५ |
| करंजवण | ५.३७ | ३.०४ | ५६ |
| गंगापूर | ५.६१ | ४.३८ | ७८ |
| गिरणा | १८.५० | ३.२५ | १८ |
| दारणा | ७.१३ | ५.७५८६ | ८२ |
| मुकणे | ७.२४ | २.४० | ३३ |

* उजनी, कोयना, जायकवाडीचा धरणसाठा अचल पातळीतील पाणीसाठा मिळून आहे.

# समृद्धीसाठी सक्तीने भूसंपादनाचा प्रस्ताव

## प्रशासनाकडून ८० टक्के जमीनी ताब्यात; २० टक्के जमीनींचा ताबा सक्तीने

**नाशिक (प्रतिनिधी) :** मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गासाठी बाजारभावाच्या पाचपट मोबदला देऊन थेट जमीन खरेदी करणाऱ्या प्रशासनाने आजवर ८० टक्के जमीन ताब्यात घेतली आहे. तरीही उर्वरित २० टक्के जागा ताब्यात मिळत नसल्याने त्यासाठी सक्तीचे भूसंपादन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसा प्रस्ताव रस्ते विकास महामंडळाला पाठविण्यात आला आहे.

शासनाने भूसंपादनाची अंतिम नोटीस प्रसिद्ध केल्यानंतर शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देऊन थेट जमीन खरेदीचा मार्ग बंद होणार आहे.  सिन्नर व इगतपुरी तालुक्यांतून शंभर किलोमीटर मार्गाची निर्मिती करण्यात येणार आहे. त्यासाठी जागामालक शेतकऱ्यांना बाजारभावाच्या पाचपट मोबदला जाहीर करण्यात येऊन ८५७ हेक्टर जमीन थेट खरेदीने घेण्यात आली आहे. मार्गावर १५७ हेक्टर जमीन शासकीय असल्याने त्याचा ताबा घेण्यात आला आहे. आता २० टक्के जमीन भाऊबंदकी तसेच न्यायालयीन वादात अडकली आहे.

सक्तीच्या भूसंपादनाशिवाय काहीच पर्याय नसल्याने शासनाने मे महिन्यात तालुक्यांसाठी प्रारूप अधिसूचना जारी केली होती. त्यावर जमीनमालकांच्या हरकतींसाठी २१ दिवस मुदत दिली होती. उपविभागीय अधिकाऱ्यांनी या हरकतींची सुनावणी पूर्ण केली आहे.

आता हा प्रस्ताव सरकारकडे मान्यतेसाठी दाखल होईल. पुढच्या आठवड्यात शासनाची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध होण्याची शक्यता असून, ती प्रसिद्ध झाल्यास पाचपट मोबदला देऊन थेट खरेदीचा मार्ग बंद होणार आहे. भूसंपादन अधिकाऱ्यांडून जमिनीच्या मोबदल्याचे निवाडे जाहीर करून भूसंपादन केले जाणार आहे.

### शिवड्याची मोजणी झाली

शिवडे ग्रामस्थांनी या महामार्गासाठी सुरवातीपासून विरोध करून त्यासाठी उच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली होती. न्यायालयाने याचिका फेटाळल्याने नागरिकांचाही विरोध मावळला असून, शिवड्याची संयुक्त जमीन मोजणी पूर्ण झाली आहे. शिवाय त्यातील बहुतांशी जागामालकांनी संमतीपत्रेही दिल्यामुळे त्यांची जमीन थेट खरेदीची प्रक्रिया राबविली जात आहे.

### सक्तीने संपादन होणारी गावे

अंतिम अधिसूचना प्रसिद्ध झाल्यास सिन्नर तालुक्यातील १३६.५९ हेक्टर जमिनीसाठी २५ गावांत सक्तीचे संपादन होणार आहे. त्यात आगासखिंड, बेलू, मर्हळ, वारेगाव, कोनांबे, खंबाळे, फुलेनगर, धोंडवीरनगर, जे. पी. नगर, पांढुर्ली, वावी, सावता माळीनगर, दुशिंगवाडी, माळढोण, मर्हळ बु., पाथरे, पाटोळे, डुबेरे, सायाळे, बोरखिंड, गोरवड या गावांचा समावेश आहे.

# इगतपुरीचे भावली धरण भरले

**सकाळ वृत्तसेवा**

**इगतपुरी :** तालुक्याची तहान भागविणाऱ्या व सिंचनाचे प्रश्न सोडविणाऱ्या दारणा नदीच्या उगमस्थानी असलेल्या एक हजार ३४९  दलघफू साठवणक्षमता असणारे भावली धरण शुक्रवारी (ता. २०) पूर्णक्षमतेने भरले.

तालुक्यात आठ दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधारेमुळे सर्व धरणांत समाधानकारक वाढ झाली आहे. महत्त्वाचे समजले जाणारे दारणा धरणही भरण्याच्या मार्गावर आहे. धरणातून १५ हजार ६९० क्युसेक विसर्ग होत आहे. तालुक्यात पडणाऱ्या पावसाच्या सरासरीच्या ५५ टक्के पाऊस आतापर्यंत झाला आहे. या वर्षी पाऊस सरासरी ओलांडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. शुक्रवार(ता. २०)पर्यंत एक हजार ९०१ मिलिमीटर पाऊस झाला आहे. भावली धरणातील साठा दारणा धरणात सोडून पुढे जायकवाडीला सोडण्यात येत आहे. संपूर्ण तालुक्याच्या पिण्याच्या पाण्याची आणि सिंचनाची मदार या धरणावर आहे. मागील काही महिन्यांत या धरणातून सातत्याने विसर्ग केल्याने धरणाने तळ गाठला होता. गेल्या वर्षी हे धरण एक ऑगस्टला भरले होते. या वर्षी पंधरा दिवस आधीच हे धरण भरले आहे. या भागातील पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची गर्दी वाढत आहे.



**इगतपुरी : शुक्रवारी ओसंडून वाहू लागलेले भावली धरण.**

# जिल्ह्यात वाहतूकदारांच्या संपाला मोठा प्रतिसाद

## गांधीगिरी मार्गाने आंदोलन सुरूच; ७ कोटींची उलाढाल ठप्प

**नाशिक (प्रतिनिधी) :** देशात वाढत चाललेली डिझेल दरवाढ, न परवडणारी टोल आकारणी, थर्ड पार्टी विम्यामध्ये अपारदर्शक वाढ, ई-वे बिल प्रणाली आदींमध्ये शासनाने दिलासा द्यावा. या प्रमुख मागण्यांसाठी ऑल इंडिया मोटार ट्रान्सपोर्ट काँग्रेसकडून देशभर छेडण्यात आलेल्या संपाला जिल्ह्यात मोठा प्रतिसाद लाभला आहे. संपामुळे जिल्ह्यातील १२ हजारांहून अधिक ट्रकची चाके थांबली असून पहिल्याच दिवशी सुमारे ७ कोटींची उलाढाल ठप्प झाली आहे.

मागण्या मान्य होईपर्यंत ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांकडून गांधीगिरी पद्धतीने बेमुदत आंदोलन सुरूच राहील. तसेच, नाशिक ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या संलग्न असलेल्या व्यावसायिकांच्या एकाही ट्रकमधून मालाची वाहतूक होणार नाही, असे असोसिएशनतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

आडगाव ट्रक टर्मिनल, विल्होळी ट्रक टर्मिनल व चेहडी नाका येथे वाहने उभे करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. आडगाव ट्रक टर्मिनल येथे ट्रकचालकांसाठी भोजनाची सेवा करण्यात आली आहे. आंदोलनादरम्यान ट्रकचालकांना असोसिएशनकडून भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील इतर ठिकाणी नाशिक ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या संलग्न असलेल्या व्यावसायिकांकडून ट्रकचालकांची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष जयपाल शर्मा यांनी दिली. या वेळी वरिष्ठ उपाध्यक्ष राजेंद्र फड, माजी अध्यक्ष अंजू सिंगल, नाशिक गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष मोतीलाल चंदा, चेअरमन एम. पी. मित्तल उपस्थित होते.

# गंगापूर धरणावर बॉंब ही केवळ अफवाच

## धमकीचा दूरध्वनी परभणीतून आल्याची शक्यता

**नाशिक (प्रतिनिधी) :** गंगापूर धरणाजवळ बॉम्ब ठेवल्याची वार्ता अफवाच असून, सुरक्षेच्या कारणास्तव येथे बंदोबस्त ठेवण्यात आल्याचे ग्रामीण पोलिस दलाने स्पष्ट केले. याबाबत तालुका पोलिस स्टेशनला आलेला दूरध्वनी परभणी येथून आला असल्याची शक्यता वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

''हम यूपीसे बोल रहें हैं, गंगापूर बांध के यहाँ बॉम्ब रखा है'' अशी धमकी देणारा एक दूरध्वनी तालुका पोलिस स्टेशनमध्ये गुरुवारी (दि. १९) आला होता. ठाणे अंमलदाराने ही माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना दिली. त्यानंतर पोलिस अधीक्षक संजय दराडे, अपर अधीक्षक विशाल गायकवाड यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी शोध कार्य हाती घेतले. बॉम्बशोधक-नाशक पथकाद्वारे तीन तास धरण परिसर पिंजून काढण्यात आला. त्यानंतर काहीही आढळून आले नाही.

याबाबत गायकवाड म्हणाले, ''बॉंब ठेवल्याबाबत आलेला दूरध्वनी हा खोडसाळपणा असून, या प्रकरणी तालुका पोलिस स्टेशनमध्ये अज्ञात व्यक्तीविरोधात अदखलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला आहे.''

तालुका पोलिस स्टेशनमध्ये असलेल्या दूरध्वनी क्रमांकास कॉलरआयडी नाही. मात्र, सायबर पोलिसांच्या मदतीने सर्व रेकॉर्ड तपासण्यात आले. त्यात परभणी येथून मोबाइलवरून एक दूरध्वनी झाल्याचे दिसते. ती व्यक्ती ट्रॅक्टरचालक असून, आपण फोन केला नसल्याचे त्याने कळविले आहे. हा अदखलपात्र गुन्हा असल्याने तपासात समोर आलेल्या बाबींनुसार न्यायालयाच्या परवानगीने पुढील तपास केला जात असल्याचे गायकवाड यांनी स्पष्ट केले.

सकाळ ॲग्रोवन — आयोजित
महाधन नजर ठेवा उद्यावर — प्रायोजित

ॲग्रोवन संवाद

**‘ॲग्रोवन’ साधणार शेतकऱ्यांशी संवाद**

**कार्यक्रम वेळापत्रक**

**सोमवार, २३ जुलै २०१८**

**विषय - दर्जेदार भाजीपाला पीक व ऊस व्यवस्थापन**
**वक्ते - डॉ. मंगेश बडगुजर**
(सहा. प्रा. किटकशास्त्र, द्राक्ष व कांदा संशोधन केंद्र, पिंपळगाव बसवंत)
**श्री. परिजीत धिके**
(वरिष्ठ व्यवस्थापक, महाधन)
**स्थळ** - गोदावरी सह. सेवा संस्था मर्या. सभागृह, चांदोरी, ता. निफाड, जि. नाशिक, **वेळ** - सकाळी ९ वा.

**विषय - दर्जेदार कांदा पीक व खत व्यवस्थापन**
**वक्ते - प्रा. आर. बी. सोनवणे**
(किडरोगशास्त्रज्ञ, द्राक्ष व कांदा संशोधन केंद्र, पिंपळगाव बसवंत)
**स्थळ** - महात्मा ज्योतिबा फुले चौक, बस स्टॅन्डजवळ, जुनी शेमळी, ता. सटाणा, जि. नाशिक, **वेळ** - सकाळी ८.३० वा.

**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**